चैन स्नॅचिंग करणाऱ्या सराईत टोळीला अटक, 12 गुन्हे उघडकीस आणुन 15 तोळे सोने हस्तगत

---

दि.20/03/2025 रोजी फिर्यादी श्रीमती कुमारीदुर्गा रामप्रभु, वय 41, रा.कपीलेश्वर नगर, निलंग्रे, चेन्नई, तामीळनाडू यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिर्डी पोलीस स्टेशन गुरनं 312/2025 बीएनएस कलम 309 (4) प्रमाणे चैन स्नॅचिंगचा गुन्हा दाखल आहे.

या गुन्हयाचे तपासात स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगर यांचे तपास पथकाने 1) सोमनाथ मधुकर चौभे, वय 39, रा.अशोकनगर, ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर व इतर आरोपींना ताब्यात घेवुन विचारपूस केली असता आरोपी सोमनाथ मधुकर चौभे याने सांगीतलेल्या माहितीवरुन व शिर्डी, तोफखाना, संगमनेर शहर व श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे अभिलेख पडताळणी करून खालीलप्रमाणे 12 चैन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

1) शिर्डी पो ठाणे गुन्हा रजि. नंबर 312/2025
2) शिर्डी पो ठाणे गुन्हा रजि. नंबर 542/2024,
3) शिर्डी पो ठाणे गुन्हा रजि. नंबर 682/2024,
4) शिर्डी पो ठाणे गुन्हा रजि. नंबर 604/2024
5) शिर्डी पो ठाणे गुन्हा रजि. नंबर 113/2025
6) शिर्डी पो ठाणे गुन्हा रजि. नंबर 648/2024
7) श्रीरामपूर शहर पो ठाणे गुन्हा रजि. नंबर1082/2024
8) तोफखाना पो ठाणे गुन्हा रजि. नंबर 232/2025,
9) तोफखाना पो ठाणे गुन्हा रजि. नंबर 212/2025,
10) श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर 8/2024,
11) संगमनेर शहर पो ठाणे गुन्हा रजि. नंबर 86/2025,
12) तोफखाना पो ठाणे गुन्हा रजि. नंबर38/2025

तपास पथकान नमूद आरोपीकडून 12 चैन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आणुन एकुण 11,04,320/- रूपये किंमतीचे 156.87 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने व 80,000/- रू किंमतीची मोटार सायकल असा एकुण 11,84,320/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ताब्यातील आरोपीतांना शिर्डी पोलीस स्टेशन गुरनं 312/2025 या गुन्हयाचे तपासकामी शिर्डी पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे. सदर कामगिरी अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखा तपास पथकाने केलेली आहे.

मालेगाव किल्ला पोलीसांकडुन दरोडयाचा गुन्हा उघडकीस

-----------------------------------------------------------------------------------

मालेगाव किल्ला पो ठाणे गु. र.क्र 57/2024 कलम 310(2),324(4),352,3(5) B. N. S प्रमाणे दाखल गुन्हयात अपर पोलीस अधीक्षक यांचे व किल्ला पोलीस स्टेशन तपास पथकाने तपास करुन गुन्हयातील आरोपींचे नाव निष्पन्न करुन त्यापैकी ५ आरोपीताना अटक केली आहे. अटक आरोपींकडुन रक्कम 7,01,000/- रुपये व गुन्हयात वापरलेली वाहने जप्त करण्यात आले आहेत. चोरीस गेलेली उर्वरित रक्कम व गुन्ह्यातील हत्यारे व इतर आरोपी यांचा शोध घेण्याचे तपासकाम सुरु आहे